05.10.2021 प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो,आत्मा आणि शरीर,जे पतित आणि काळे बनले आहेत, बाबाच्या आठवणी द्वारे त्यांना पावन बनवा,कारण आता पावन दुनिये मध्ये जायचे आहे"

प्रश्नः- भगवान कोणत्या मुलांना भेटतात,बाबांनी कोणता हिशोब सांगितला आहे?

उत्तरः- ज्यांनी सुरुवातीपासून भक्ती केली आहे,त्यांनाच भगवंत भेटतात. बाबांनी हा हिशोब सांगितला आहे की,सर्वात प्रथम तुम्ही भक्ती करतात म्हणून तुम्हालाच प्रथम भगवंता द्वारे ज्ञान मिळते,ज्याद्वारे तुम्ही नवीन दुनिया मध्ये राज्य करतात.बाबा म्हणतात,तुम्ही अर्ध्याकल्पा पासून माझी आठवण केली आहे,आत्ता मी आलो आहे,तुम्हाला भक्तीचे फळ देण्यासाठी.

गीतः- मरना तेरी गली मे, जिना तेरी गलीमे…..

ओम शांती. मुलांनी गीत ऐकले.जेव्हा कोणाचा मृत्यू होतो,तर पित्याजवळ जन्म घेतात.तुम्ही जाणता आम्ही आत्मा आहोत.ती झाली शरीराची गोष्ट.एक शरीर सोडून दुसऱ्या पित्याजवळ जन्म घेतात.तुमचे अनेक साकारी पिता झाले आहेत.वास्तविक निराकार पित्याचे तुम्ही मुलं आहात. तुम्ही आत्मा परमपिता परमात्मा चे मुलं आहात,परमधामचे राहणारे आहात,ज्याला निर्वाणधाम किंवा शांतीधाम म्हटले जाते.बाबा पण तेथेच राहतात,येथे येऊन लौकिक पित्याचे मुलं बनतात,परत त्या पारलौकिक पित्याला विसरतात. सतयुगा मध्ये तुम्ही सुखी बनतात,तर त्या पारलौकिक पित्याला विसरतात. सुखांमध्ये त्या पित्याचे स्मरण करत नाहीत,दुःखामध्ये आठवण करतात आणि आत्माच आठवण करते. जेव्हा लौकिक पित्याची आठवण करतात,तर बुद्धी शरीराकडे जाते. त्या बाबांची आठवण करतात, म्हणून म्हणता,ओ बाबा,दोन्ही बाबा आहेत.बरोबर अक्षर पिता आहे.ते पिता पण आहेत,हे पण पिता आहेत.आत्मा,आत्मिक पित्याची आठवण करते,तर बुद्धी परमधाम मध्ये चालली जाते.हे बाबाच मुलांना समजवतात.आता तुम्ही जाणतात, बाबा आले आहेत,आपले बनवले आहे.प्रथम तुम्हाला स्वर्गामध्ये पाठवले होते,तुम्ही खूप सावकार होते,परत 84 जन्म घेत वैश्विक नाटकानुसार आता तुम्ही दुःखी बनले आहात.बेहद नाटकानुसार ही जुनी दुनिया नष्ट होणार आहे.तुमची आत्मा आणि शरीर रुपी वस्त्र सतो प्रधान होते,परत सुवर्णयुगा मधून चांदीचे युगामध्ये आले,तर शरीर पण चांदीसारखे झाले,परत ताम्रयुगा मध्ये आले.आता तर तुमची आत्मा बिलकुलच पतित झाली आहे,तर शरीर पण पतित मिळते.तसे तर १४ कॅरेट सोने कोणी पसंत करत नाही, काळे पडते,तुम्हीपण काळे लोहयुगी बनले आहात.आता आत्मा आणि शरीर जसे काळे बनले आहे,परत पवित्र कसे बनतील.आत्मा पवित्र बनली तर शरीर पण पवित्र मिळते. ते कसे होईल,काय गंगा स्नान करण्या द्वारे होईल, नाही.ईश्वराला बोलवतात,हे पतित पावन या.हे आत्मा म्हणते,तर बुद्धी पारलौकिक पित्याकडे चालली जाते. बाबा अक्षर किती गोड आहे.भारतामध्येच बाबा बाबा म्हणत राहतात.आता तुम्ही आत्माभिमानी बनून बाबाचे बनले आहात.बाबा म्हणतात,मी तुम्हाला स्वर्गामध्ये पाठवले होते,नवीन शरीर धारण केले होते.आता तुम्ही किती श्रेष्ठ बनले आहात,या गोष्टी मनामध्ये राहिल्या पाहिजेत.बाबांची च आठवण करायला पाहिजे.तसे आठवण तर सर्व करतात,ओ बाबा, आम्ही आत्मे पतित बनलो आहोत, आता येऊन पावन बनवा.वैश्विक नाटकांमध्ये भूमिका आहे,तेव्हा तर बोलवतात.वैश्विक नाटकानुसार येतील तेव्हाच,जेव्हा जुनी दुनिया नवीन बनवायचे असते.तर जरूर संगमयुगा मध्ये येतील.तुम्हा मुलांना निश्चय आहे की,शिवबाबा सर्वात प्रिय आणि गोड आहेत.असे पण म्हणतात, गोड, अतिगोड.आता गोड कोण आहेत.लौकिक संबंधांमध्ये प्रथम पिता आहेत,जे जन्म देतात,परत शिक्षक आहेत.शिक्षका द्वारे तुम्ही पद मिळवतात.ज्ञानाला कमाईचे साधन म्हटले जाते.ज्ञान म्हणजे नॉलेज,योग म्हणजे आठवण.तर बेहद्दचे कोणालाही माहिती नाही.चित्रा मध्ये स्पष्ट दाखवले आहे,ब्रह्मा द्वारा स्थापना, शिवबाबा करतात.कृष्ण कसे राजयोग शिकवतील?राजयोग सतयुगासाठी शिकवतात.ते तर जरूर संगमयुगा मध्ये बाबांनी शिकवला असेल.सतयुगाची स्थापना करणारे बाबाच आहेत,ब्रह्मा द्वारा करवतात,ते कर्ता-करविता आहेत ना.ते लोक तर त्रिमुर्ती ब्रह्मा म्हणतात परंतु उच्च ते उच्च शिवबाबाच आहेत ना.ते साकार आहेत की निराकार आहेत,सृष्टी पण हीच आहे, सृष्टीचे चक्र फिरत राहते, पुनरावृत्ती होत राहते.सुक्ष्म वतनच्या सृष्टीच्या चक्राचे गायन केले जात नाही.विश्वाच्या इतिहास भूगोलाची

पुनरावृत्ती होते,गायन पण आहे, सतयुग त्रेता,द्वापर,कलियुग,तर मध्ये जरूर संगमयुग पाहिजे.नाहीतर कलयुगाला सतयुग कोण बनवेल. नर्काला स्वर्ग बनवण्यासाठी शिव पिता संगमयुगा मध्येच येतात. जितकी जुनी दुनिया तेवढे दुःख जास्त होते.आत्मा जेवढी तमोप्रधान बनत जाते,तेवढी दुःखी होत जाते. देवता सतोप्रधान आहेत.हे तर सर्वोच्च अधिकारी आहेत,ईश्वरीय पित्याचे शासन आहे,सोबत धर्मराज पण आहेत.बाबा म्हणतात तुम्ही शिवालय मध्ये राहत होते,आत्ता तर वेश्यालय आहे.तुम्ही पावन होते,आत्ता पतित बनले आहात.तर म्हणतात,आम्ही तर पापी आहोत. आत्मा म्हणते मज निर्गुण मध्ये काहीच गुण नाहीत.कोणत्याही देवी-देवतांच्या मंदिरामध्ये जाल तर त्यांच्या पुढे असेच म्हणतात.हे तर शिव पित्याच्या समोर म्हणायला पाहिजे,त्यांना सोडून भावाच्या पुढे म्हणतात.हे तर देवता तर भाऊ-भाऊ झाले ना.भावाकडून काहीच मिळणार नाही.भावांची पूजा करत करत खाली उतरत आले आहेत.आता तुम्ही मुलं जाणतात, शिव पिता आले आहेत,त्यांच्याकडून आम्हाला वारसा आपोआप मिळतो. बाकी मनुष्य तर बाबांना जाणत नाहीत,सर्वव्यापी म्हणतात.काही परत म्हणतात,अखंड ज्योति तत्त्व आहे.कोणी म्हणतात नाव रूपापेक्षा वेगळा आहे.अरे तुम्ही म्हणता ना, अखंड ज्योति स्वरूप आहे,परत नाव रूपापेक्षा वेगळा कसा होऊ शकतो. बाबाला न जाणल्यामुळे पतित बनले आहेत.तमोप्रधान पण बनवायचे आहे,परत जेव्हा बाबा येतात,तर सर्वांना पावन बनवतात.आत्मे निरकारी दुनिये मध्ये सर्व पित्या सोबत राहते,परत येथे येऊन भूमिका वठवते.आत्माच पित्याची आठवण करते.बाबा येतात आणि म्हणतात, ब्रह्मा तनाचा आधार घेतो.हा भाग्यशाली रथ आहे,बिगर आत्मा,रथ थोडाच असतो.असे म्हणतात भागीरथ ने गंगा आणली. आता ही गोष्ट तर होऊ शकत नाही, परंतु काहीच समजत नाहीत,की आम्ही काय करतो.

आता तुम्ही मुलांनी समजले आहे,ही ज्ञान वर्षा आहे.याद्वारे काय होते? पतित पासून पावन बनतात. गंगा जमुना तर सतयुगा मध्ये पण असतात.कृष्ण तर सतयुगाच्या किनाऱ्यावर खेळपाळ करत होते,असे म्हणतात.अशी कोणती गोष्ट नाही,त्याचे तर खूप चांगल्या प्रकारे पालन पोशन होते,कारण फुल आहे ना.फुलं खूप सुंदर असतात. फुलांचा सर्व सुगंध घेतात.काट्यांचा थोडाच सुगंध घेतात.आत्ता तर काट्यांची दुनिया आहे.या जंगलाला बाबा येऊन फुलांची बाग बनवतात, म्हणून त्यांना बबुलनाथ नाव पण दिले आहे.काट्या पासून फुल बनवतात म्हणून महिमा गातात, काट्यांना फुल बनवणारे बाबा.आता तुम्हा मुलांना बाबाच्या सोबत खुप प्रेम असेल हवे.आता तुम्ही जाणता, आम्ही बेहद्दच्या बाबाचे बनलो आहोत.आता तुमचा संबंध त्यांच्याशी आहे आणि लौकिकशी पण आहे.पारलौकिक पित्याची आठवण केल्यामुळे तुम्ही पावन बनाल.आत्मा जाणते ते आमचे लौकिक पिता आणि हे पारलौकिक पिता आहेत.भक्तिमार्गा मध्ये आत्मा जाणते,हे आमचे लौकिक पिता आणि हे ईश्वरी पिता आहेत. अविनाशी पित्याची आठवण करतात.ते पिता कधी येऊन स्वर्गाची स्थापना करतात,हे कोणालाच माहीत नाही.बाबा येतात पतितांना पावन बनवण्यासाठी,तर जरूर संगमयुगा मध्येच येतील.ग्रंथामध्ये तर कल्पाचे आयुष्य लाखो वर्षे लिहले आहे,यामुळे मनुष्य अंधारात आहेत.असे जे खूप भक्ती करतात त्यांनाच भगवान भेटतात.तर सर्वांत जास्त भक्ती करणाऱ्यांना तर प्रथम भेटायला पाहिजेत.बाबांनी हिशोब सांगितला आहे,सर्वात प्रथम तुम्ही भक्ती करतात,तर तुम्हालाच प्रथम भगवंताचे ज्ञान मिळायला पाहिजे,जे परत तुम्हीच नवीन दुनिया मध्ये राज्य करावयाचे आहे.बेहद्दचे पिता तुम्हा मुलांना ज्ञान देतात,यामध्ये कष्टाची कोणतीच गोष्ट नाही.बाबा म्हणतात तुम्ही अर्धाकल्प आठवण केली आहे.सुखामध्ये तर कोणी आठवण करत नाहीत.अंतकाळात जेव्हा दुःखी होतात,तेव्हाच येऊन सुखी बनवतो.आता तुम्ही खूप मोठे मनुष्य बनतात.मुख्यमंत्री, पंतप्रधान इत्यादी चे बंगले खूप चांगले असतात,फर्निचर इत्यादी पण खूप चांगले असते.तुम्ही तर खूप मोठे मनुष्य,देवता बनत आहात.दैवी गुण असणारे देवता स्वर्गाचे महल पण हिऱ्या रत्नांचे असतात.हे रुद्र ज्ञान यज्ञ आहे.सतयुगा मध्ये यज्ञ किंवा भक्ती ची गोष्ट नसते.या वेळेतच बाबा अविनाश रुद्र ज्ञान यज्ञाची स्थापन करतात,त्याचे परत गायन चालते.भक्ती तर नेहमी चालत नाही. भक्ती आणि ज्ञान,भक्ती रात्र आहे, तर ज्ञान दिवस आहे.बाबा दिवस बनवतात,तर मुलांचे बाबा सोबत खूप प्रेम असायला हवे.बाबा आम्हाला विश्वाचे मालक बनवतात. सर्वात प्रिय बाबा आहेत ना,त्यांच्या पेक्षा प्रेमळ दुसरी कोणती वस्तू नसते.अर्ध्या कल्पापासून आठवण करत आले आहात.बाबा येऊन आमचे दुःख दूर करा.आत्ता बाबा आले आहेत,ते समजवतात मुलांनो, तुम्ही आपल्या गृहस्थ व्यवहारांमध्ये राहायचे आहे.येथे बाबांच्या जवळ किती बसून राहणार? सोबत तर परमधाम मध्येच राहु शकतात.येथे तर राहु शकत नाही.येथे तर ज्ञान शिकायचे आहे.ज्ञान घेणारे थोडेच असतात.लाऊड स्पीकर वरती शिक्षण होते काय? शिक्षक प्रश्न कसे विचारतील? लाऊडस्पीकर वरती प्रतिसाद कसे देऊ शकतील,म्हणून थोड्या

थोड्या विद्यार्थ्यांना शिकवतात.महाविद्यालय तर खूप असतात,परत सर्वांची परीक्षा होते,परत परिणाम निघतो.येथे तर एक बाबाच शिकवतात.हे पण समजायला पाहिजे की,दोन पिता आहेत,लौकिक आणि पारलौकिक. दुःखामध्ये त्या पारलौकिक पित्याचे सर्व आठवण करतात.आता बाबा आले आहेत,महाभारत लढाई पण समोर आहे.ते समजतात महाभारत लढाईमध्ये कृष्ण आले,असे तर होऊ शकत नाही,बिचारे संभ्रमित झाले आहेत,परत कृष्ण कृष्ण करत राहतात.आता सर्वात प्रिय तर शिव बाबा आहेत आणि कृष्ण पण आहेत.परंतु ते निराकार आणि हे साकार आहेत.निराकार पिता सर्व आत्म्यांचे पिता आहेत.दोघे खूप प्रिय आहेत.कृष्ण पण विश्वाचे मालक आहेत ना.आता तुम्ही निर्णय करू शकता की जास्तीत जास्त प्रिय कोण आहे.शिव बाबाच असे लायक बनवतात ना.कृष्ण काय करतात?शिवपिताच त्यांना असे श्रेष्ठ बनवतात ना. तर गायन पण जास्ती शिव पित्याचे व्हायला पाहिजे ना. बाबाने समजावले आहे, तुम्ही सर्व पार्वती आहात,शिव अमरनाथ तुम्हाला कथा ऐकवत आहेत.तुम्ही सर्व अर्जुन आहात, तुम्ही द्रोपदी पण आहात.या विकारी दुनियाला रावण राज्य म्हटले जाते. ती निर्विकारी दुनिया आहे,तेथे विकाराची गोष्टच नाही.निराकार पिता विकारी दुनिया कशी स्थापन करतील?विकारामुळे च दुःख होते. संन्याशांचा हठयोग आहे, निवृत्तीमार्ग आहे.कर्मसंन्यास तर कधी होऊ शकत नाही.तो तर तेव्हाच होऊ शकेल,जेव्हा आत्मा शरीरापासून वेगळी होईल.गर्भ जेल मध्ये परत कर्मचा हिशेब सुरू होतो. बाकी कर्मसंन्यास म्हणणे चुकीचे आहे.हठयोगग इत्यादी खूप शिकतात,गुफा मध्ये जाऊन बसतात,अग्नी मधून पण चालतात.रिध्दी-सिध्दी पण खूप आहे.जादुगरी मधून खूप गोष्टी काढतात.भगवंताला जादूगर,रत्नागर सौदागर म्हणतात,परंतु त्या संन्याशा द्वारे कोणाला सद्गती मिळू शकत नाही.ते तर एकच खरे सद्गुरु येऊन सर्वांची सद्गती करतात.अच्छा.

गोड गोड फार फार वर्षांनंतर भेटलेल्या मुलांप्रती मात पिता बाप दादाची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात.आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. (१)काट्यापासून फुल बनवणारे,सर्वात प्रिय एक शिव पिताच आहेत,त्यांची खूप प्रेमाने आठवण करायची आहे.सुगंधित पावन फुल बनून,सर्वांना सुख द्यायचे आहे.
2. (२) हे ज्ञान कमाईचे साधन आहे, त्याद्वारे २१ जन्मासाठी खूप मोठे मनुष्य बनतात,म्हणून चांगल्या प्रकारे राजयोग शिकायचा आहे आणि शिकवायचा पण आहे.आत्म अभिमानी बनायचे आहे.

वरदान:- बापदादाला आपला सोबती समजून डबल शक्तीने कार्य करणारे सहजयोगी भव.

कोणते ही कार्य करतात,तर बाप दादाला आपले साथी बनवा, तर डबल शक्तीने कार्य होईल आणि स्मृती पण खूप सहज राहील,कारण जे सोबत राहतात त्यांची आठवण स्वतच राहते.तर असे सोबती राहिल्यामुळे किंवा बुद्धी द्वारे निरंतर सत्याचा संग केल्यामुळे,सहज्योगी बनाल आणि शक्तिशाली संगत असल्यामुळे प्रत्येक कर्तव्या मध्ये डबल शक्ती राहील,त्यामुळे प्रत्येक कार्यामध्ये सफलतेची अनुभूती होईल.

बोधवाक्य:- महारथी तेच आहेत,जे कधी मायेचा प्रभावा मुळे परवश होणार नाहीत.

||| ओम शांती |||